# ऋतायन संस्कृत-साहित्य-रसास्वाद वर्ग-भाग १ 'नाटके'

ऋतायन व संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'संस्कृत रसास्वाद वर्ग-भाग १ नाटके' आयोजित करण्यात येत आहे. **<u>४ ऑक्टोबर २०१५ - २८ ऑक्टोबर २०१५</u>** या कालावधीत ही व्याख्यानमाला रामकृष्ण बजाज संस्कृत भवन येथे आयोजित केली जाईल. 'काव्येषु नाटकं रम्यम् ।' या वचनाप्रमाणे संस्कृत काव्यामध्ये 'नाटक' या साहित्यप्रकाराचे विशेष महत्त्व आहे. नाट्य हे दृश्यकाव्य असल्याने कालिदासाने या वाङ्मयप्रकाराचा उल्लेख 'चाक्षुष क्रतु' असा केला आहे. रोजच्या जीवनातील कटकटी, त्रास, दु:खे यांच्यापासून किंचित् विश्रांती मिळावी व मनोविनोदन व्हावे या दृष्टीने 'नाट्यवेद' नामक पंचम वेदाची निर्मिती झाली. (क्रीडनीयकमिच्छामो दृश्यं श्रव्यं च यद् भवेत् । नाट्यशास्त्र १.११). नाट्य हे लोकव्यवहाराचे, तत्कालीन समाजाचे, मानवी भावभावनांचे प्रतिबिंब असते. नट लोकव्यवहाराचे चित्रण स्वत:च्या अभिनयामधून नाट्यामध्ये करीत असतात. त्यामुळेच नाट्याला 'लोकवृत्तानुकरणम्', 'भावानुकरणम्' असे म्हटले जाते.

'योऽयं स्वभावो लोकस्य सुखदु:खसमन्वित: ।
सोऽङ्गाद्यभिनयोपेत: नाट्यमित्यभिधीयते ॥' (नाट्यशास्त्र १.२१)

भास, कालिदास, शूद्रक, विशाखदत्त, भट्टनारायण, भवभूति या नाटककरांनी संस्कृतसाहित्यसृष्टीत आपापल्या अनन्यसाधारण कलाकृतींनी स्वत:चे स्थान निर्माण केले. यांच्या काही निवडक नाटकांचा रसास्वाद या व्याख्यानमालिकेमध्ये आपण घेणार आहोत. त्याची रूपरेषा खालीलप्रमाणे----

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ४/१०/२०१५ (रविवार) | संस्कृत नाटके- परिचय | डॉ. परिणीता देशपांडे | १०.००-११.०० |
| २ | ४/१०/२०१५ (रविवार) | उत्तररामचरित | डॉ. परिणीता देशपांडे | ११.००-१.०० |
| ३ | ७/१०/२०१५ (बुधवार) | मुद्राराक्षस | डॉ. आसावरी बापट | ३.३०-५.३० |
| ४ | ११/१०/२०१५ (रविवार) | प्रतिमा | प्रा. प्रसाद भिडे | १०.००-११.०० |
| ५ | ११/१०/२०१५ (रविवार) | कर्णभार-उरूभङग | श्रीमती समीरा गुजर जोशी | ११.००-१.०० |
| ६ | १४/१०/२०१५ (बुधवार) | वेणीसंहार | डॉ. माधवी नरसाळे | ३.३०-५.३० |
| ७ | १८/१०/२०१५ (रविवार) | विक्रमोर्वशीय | प्रा. सुचित्रा ताजणे | ११.००-१.०० |
| ८ | २१/१०/२०१५ (बुधवार) | मृच्छकटिक | प्रा. शकुंतला गावडे | ३.३०-५.३० |
| ९ | २५/१०/२०१५ (रविवार) | स्वप्नवासवदत्त | डॉ. अलका बाकरे | ११.००-१.०० |
| १० | २८/१०/२०१५ (बुधवार) | अभिज्ञानशाकुन्तल | डॉ. गौरी माहुलीकर | ३.००-५.०० |
| ११ | २८/१०/२०१५ (बुधवार) | समारोप | डॉ. गौरी माहुलीकर | ५.००-५.३० |

नावनोंदणी शुल्क - रु. ६००/- (१ ऑक्टोबरपर्यंत संपर्क साधावा )

व्याख्यानमालेकरिता नोंदणी करण्यासाठी संपर्क साधावा-

रामकृष्ण बजाज संस्कृत भवन, विद्यानगरी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई -४०० ०९८
श्रीमती मेधा देशपांडे- ९९३०७०११५२ (diggikar.anamika@gmail.com)